पुढारी

संक्षिप्त

# उत्पादनाबरोबर कामगार सुरक्षा महत्त्वाची : डॉ. पी. डी. राऊत

**कोल्हापूर :** उद्योगामध्ये बऱ्याचवेळा उत्पादन जास्त करण्याकडे लक्ष दिले जाते. कामगारांच्या सुरक्षेकडे लक्ष दिले जात नाही. उत्पादनाबरोबर कामगार सुरक्षा महत्त्वाची आहे. या मनुष्यबळाचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी केले. पर्यावरणशास्त्र अधिविभाग व युनिव्हर्सिटी इंडस्ट्री इंटरॅक्शन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) 'स्ट्राईड' योजनेंतर्गत औद्योगिक सुरक्षा विषयावर दोन दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेस सुरुवात झाली. डॉ. राऊत यांनी औद्योगिक सुरक्षा व त्यांचे पालन, सुरक्षेची साधने विषयावर मांडणी केली. पर्यावरणतज्ज्ञ पंकज कदम यांनी औद्योगिक सुरक्षा व कायदा विषयावर मार्गदर्शन केले. बुधवारी (दि. १३) महाडचे अमेय काळे व पुण्याचे सागर अहिवाळे औद्योगिक सुरक्षाविषयक मुद्द्यांवर ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत.

# मातृदिन साजरा

कोल्हापूर : जागतिक मातृदिनानिमित्त राजारामपुरी येथील माऊली चौक येथे महापौर निलोफर आजरेकर यांच्या हस्ते मातृदिन साजरा करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या आई नागरबाई यांचा त्यांच्या निवासस्थानी प्रातिनिधीक सत्कार महापौर आजरेकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच चिरमुरे विक्री करून मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी झटलेल्या शांताबाई सोरप यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. दिलासा सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष प्रा. डॉ. रूपा शहा यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी उपमहापौर संजय मोहिते, परिवहन समिती सभापती प्रतिज्ञा उत्तुरे अनिता देसाई आदी उपस्थित होते.